तरुण भारत गुरुवार २८ एप्रिल २०२२

## दोडामार्ग कॉलेजमध्ये उद्या आहार कार्यशाळा

**दोडामार्ग :** लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातील हॉटेल मॅनेजमेंट या विभागाच्यावतीने एकदिवशीय आरोग्यसंपन्न व सकस आहार या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा २९ रोजी दुपारी तीन वाजता या महाविद्यालयात होणार आहे. आजचे धकाधकीचे जीवन त्याचबरोबर खाद्य पदार्थांवर वापरण्यात येणारी रसायने आणि त्यामुळे उद्भवणारे आजार व फास्ट फुडकडे मोठ्या प्रमाणात तरुणवर्ग झुकत आहे. तेच खाद्यपदार्थ आपण आपल्या घरच्याघरी कसे रुचकर बनवू शकतो, याचे मार्गदर्शन या कार्यशाळेत करण्यात येणार आहे. योग्य व अयोग्य आहार कोणता? आहाराच्या वेळा व इतर आहारा संदर्भातील अनेक विषयांवर मार्गदर्शन व प्रात्यक्षिक केले जाणार आहे. नाव नोंदणीसाठी ७७९६२७१६६३ या नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. सुभाष सावंत व हॉटेल मॅनेजमेंट विभागाचे प्रा. गौरेश कर्पे यांनी केले आहे.